संगीत ही पाहण्याची नसून, ऐकण्याची गोष्ट - कीरवानी

पुणे, दि, १९ जानेवारी २०२४ : लोक संगीत डोळ्याने पाहतात त्यामुळे, संगीतकार चित्रपट कलाकारांसारखे प्रसिद्ध नसतात, संगीत ही पाहण्याची नसून, ऐकण्याची गोष्ट आहे, असे मत संगीत दिग्दर्शक एम. एम. किरवानी यांनी व्यक्त केले.

पुणे येथे सुरू असलेल्या २२ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) आज महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल यांनी ऑस्कर विजेते संगीत दिग्दर्शक किरवानी यांची मुलाखत घेतली.

किरवानी म्हणाले, की चित्रपटातील कोणतेही गाणे हे गीतकार, गायक आणि संगीतकार अशा सगळ्यांच्या एकत्रीत प्रयातनातून तयार होते. मात्र ते पडद्यावर नायकाच्या स्वरूपात दिसते आणि लोक गाणे पडद्यावर बघतात आणि त्यांच्या नावाने गाणे लक्षात ठेवतात. जेंव्हा लोक संगीतकाराच्या संदर्भात गाणे लक्षात ठेवतील, तेंव्हा संगीतकार प्रसिद्ध होतील्.

आपल्या संगीतीक प्रवासाबद्दल बोलताना त्यांनी सांगितले, की त्यांच्या वडिलांनी त्यांना संगीताची ओळख करून दिली. त्यांनी व्हायोलीन वाजवण्यापासून संगीत शिकायला सुरुवात केली. मात्र नंतर त्यांनी वडिलांच्या सूचनेनुसार संगीताची धुन तयार करायला सुरुवात केली आणि नंतर ते हार्मोनियम आणि पियानो वाजवू लागले. राघवेंद्र स्वामी यांच्यावरील गाणे त्यांनी प्रथम तयार केले आणि त्यांचा संगीत दिग्दर्शक म्हणून प्रवास सुरू झाला.

पार्श्वसंगीत देणारा संगीतकार आणि गाणे तयार करणारे संगीतकार यांच्यामध्ये काय दर्जाचा फरक आहे, असे विचारता कीरवानी म्हणाले, किचनमध्ये काम करताना कोणी स्वयंपाक करतो, कोणी भांडी धुण्याचे काम करतो. कोण श्रेष्ठ आणि कोण कनिष्ठ असा काही फरक नाही. ज्याला जे काम जमते ते तो काम करतो.

लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्याविषयीच्या आठवणीही त्यांनी सांगितल्या.

.. --------------------------------------

तंत्रज्ञान बदलले तरी चित्रपट महोत्सव

कायम राहतील - गौतम घोष

पुणे, दि. १९ जानेवारी २०२४ : तंत्रज्ञान कितीही बदलले तरी चित्रपट महोत्सव कायम राहतील, असे मत राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक गौतम घोष यांनी व्यक्त केले. पुणे येथे सुरू असलेल्या २२ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) आज महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल यांनी राष्ट्रीय घोष यांची मुलाखत घेतली.

घोष म्हणाले, "आता ओटीटीचे तंत्र आले आहे. त्यामुळे चित्रपट महोत्सवात येऊन चित्रपट कोण पाहणार असा प्रश्न काहीजण उपस्थित करतात, मात्र हे खरे नाही. लोक एकत्रीतपणे हसतात, रडतात. लोकांना चित्रपटाचा एकत्रीत अनुभव केवळ चित्रपट महोत्सवांमध्ये मिळतो. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट

महोत्सवाविषयी बोलताना घोष म्हणाले, की हा एक वेगळा महोत्सव आहे. कारण इथला प्रेक्षक वेगळा आहे. या महोत्सवामध्ये अभ्यासात्मक कार्यक्रम होतात आणि उच्च दर्जाचे चित्रपट असतात. त्यामुळे हा महोत्सव महत्त्वाचा आहे.

घोष म्हणाले, चित्रपट ही कला शास्त्रज्ञांच्या प्रयत्नातून जन्माला आली आहे, त्यामुळे त्यामध्ये तांत्रीक बदल सातत्याने होत राहणार आहे. पूर्वी १६ मी.मी. फिल्मवर चित्रपट केले जायचे, ते तंत्र बदलले आणि व्हिडीओ तंत्र आले पुढे डिजिटल तंत्र आले. मात्र चित्रपटाने या सगळ्या गोष्टी आत्मसात केल्या. कारण चित्रपट तयार होतानं कॅमेऱ्यामागची दृष्टी महत्त्वाची असते. या सगळ्यामध्ये बाजारपेठ महत्त्वाची असते आणि त्याचा एक दबावही असतो. बाजारपेठ जे म्हणेल, त्यानुसार बदल घडत जातात.

घोष पुढे म्हणाले, "कॅमेऱ्याच्या मागचा जो व्ह्यू फाईंडर असतो, तो महत्त्वाचा असतो. त्यामधून दिसणारी फ्रेम चांगली, वाईट, कशीही असो, ती तुमची फ्रेम असते. त्यातून तुम्ही जग बघत असता. त्यामुळे छायाचित्रकार आणि दिग्दर्शक एक असला आणि वेगवेगळा असला, की फरक पडतो." ते म्हणाले, की ते जेंव्हा इतर दिग्दर्शकांसाठी छायाचित्रण करत असतात, तेंव्हा तेच दिग्ददर्शकाच्या भूमिकेमध्ये बऱ्याचवेळेला जातात.

---

चित्रपट निर्मितीच्या घटकांना एकत्र आणण्यासाठी

शासनाचे वेब पोर्टल – अविनाश ढाकणे

पुणे, दि. १९ जानेवारी २०२४ : महाराष्ट्र शासनाने चित्रपट निर्मात्यांसाठी एक पोर्टल तयार केले असून, त्याद्वारे निर्माते, कथा-पटकथाकार, दिग्दर्शक आणि निधी पुरवठा करणारे एकत्रीत येऊ शकतील, अशी माहिती दादासाहेब फाळके चित्रनगरीचे व्यवस्थापकीय संचालक अविनाश ढाकणे यांनी आज दिली.

पुणे येथे सुरू असलेल्या २२ व्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात (पिफ) आज 'महाराष्ट्र शासनाचे चित्रपटविषयक धोरण आणि छायाचित्रण स्थळे', या विषयावर आयोजित परिसंवादामध्ये ढाकणे बोलत होते. यावेळी अभिनेते मिलिंद गुणाजी आणि महोत्सवाचे संचालक डॉ. जब्बार पटेल उपासतहीत होते. डॉ. पटेल यांनी ढाकणे आणि गुणाजी यांना बोलते केले.

ढाकणे म्हणाले, की यापुढे उटाम कथा असणाऱ्या लेखकाला कोणाचे उंबरे झिजवावे लागणार नाहीत. त्यांना चित्रपट तयार करणाऱ्या इतर घटकांशी जोडण्यासाठी महराष्ट्र शासनाने एक वेब पोर्टल तयार केले आहे. त्याद्वारे सर्वजण एकत्र येतील. ज्यांना कथा आवडेल ते त्या कथा काराशी संपर्क साधतील.

ढाकणे पुढे म्हणाले, की शासनाने दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये मराठी चित्रपटांसाठी शूटिंगसाठी ५० टक्के सवलत दिली आहे. तसेच महितीपटाच्या निर्मितीसाठीही निधी देण्याचा विचार सुरू आहे. मराठी चित्रपटांच्या शुटींसाठी सरकारी जागा विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येत असून, चित्रपट निर्मितीच्या परवानगीसाठी एक खिडकी योजना आणण्यात आली आहे.

चित्रपट निर्मितीचे वातावरण निर्माण होण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. चित्रपट निरमीसाठी काही सूचना असल्यास त्यांचे स्वागत करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना मिलिंद गुणाजी म्हणाले, "महाराष्ट्राच्या दुर्गम भागांमधे सुंदर ठिकाणे आहेत. त्या ठिकाणापर्यंत वाहतूक आणि इतर सोयी सुविधा पोहचल्यास त्या ठिकांणांवर उत्तमप्रकारे चित्रीकरण होऊ शकेल. महाराष्ट्रात डोंगर, दऱ्या खोऱ्यांमध्ये अशी अनेक ठिकाणे दडलेली आहेत. चित्रीकरणासाठी योग्य असलेल्या जागांवर पर्यटकांचे नियमन झाले पाहिजे, तरच त्याचा चित्रीकरणासाठी उपयोग होऊ शकेल." जुन्नर जवळील जीवधन, शिवनेरी, माळशेज घाट ,त्याचबरोबर कास पठार या स्थळांचा उल्लेखही त्यांनी केला.